विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य या आस्थापनेस नागपूर प्रादेशिक कार्यालय सुरु करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय, क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.४८/विमा प्रशासन
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : ०१ मार्च , २०१९

<u>वाचा</u> :-

१) विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनि-२६१६/प्रादेशिक कार्यालय/जा.क्र.४९७/२०१७/प्रशा., दि.२३.०१.२०१७

<u>प्रस्तावना:-</u>

महाराष्ट्र शासनाचे वित्तीय / आर्थिक हितसंबंध जेथे गुंतलले आहेत, अशा सर्व आस्थापनांच्या विमाविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी व पर्यायाने शासकीय महसुलाची बचत करुन शासनाच्या विकास योजनांना मदत करावी या उद्दिष्टपूर्तीकरिता वित्त विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय विमा निधी म्हणजेच विमा संचालनालय हे कार्यालय सन १९५१ पासून विमासेवा पुरवीत आहे. विमा संचालनालयाचे एकमेव कार्यालय मुंबई येथे असून त्यांचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्यात पसरलेले आहे. मुंबई येथून राज्यात सर्वदूर परसलेल्या विमा ग्राहकांना तत्पर व स्थानिक विमासेवा उपलब्ध करुन देणे जिकीरीचे होत असल्याने नागपूर येथे विमा संचालनालयाचे प्रादेशिक कार्यालय निर्माण करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता. त्यादृष्टीने शासन आता पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

<u>शासन निर्णय:-</u>

विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नागपूर येथे प्रादेशिक कार्यालय सुरु करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. नागपूर प्रादेशिक कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नागपूर व अमरावती प्रादेशिक विभागातील खालील जिल्हे असतील :-

नागपूर प्रादेशिक विभाग - वर्धा, नागपूर,भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली.

अमरावती प्रादेशिक विभाग- बुलढाणा,अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ

३. विमा संचालनालयाच्या नागपूर प्रादेशिक कार्यालयासाठी सद्य:स्थितीत कोणतीही नवीन पदे निर्माण न करता, विमा संचालनालय, मुंबई कार्यालयातील खालील पदे नागपूर कार्यालयात हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

अ.क्र.	पदनाम	संवर्ग	संख्या
१	सहाय्यक विमा संचालक	गट-अ	१
२	कनिष्ठ तांत्रिक अधिकारी	गट-ब	३
३	तांत्रिक सहाय्यक	गट-क	३
४	लिपिक-टंकलेखक	गट-क	४
५	शिपाई	गट-ड	२
एकूण			१३

उपरोक्त तक्त्यातील अ.क्र.१ ते ३ मधील अधिकारी/कर्मचारी यांची बदली आवश्यकतेनुसार नागपूर येथे करण्यात येईल. तसेच अ.क्र.४ व ५ येथील पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यात येतील.

४. नागपूर प्रादेशिक कार्यालयासाठी भाडेतत्वावर जागा घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबतची सर्व कार्यवाही विमा संचालनालयाने करावी. याबाबत शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,दि.१७.०४.२०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, भाग पहिला, उप विभाग एक, अ.क्र.१० अनुसार विहित केलेल्या अटींचे पालन करण्यात यावे.

५. नागपूर प्रादेशिक कार्यालयासाठी **सहाय्यक विमा संचालक (गट-अ)** यांना प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख घोषित करण्यात येत आहे.

६. नागपूर प्रादेशिक कार्यालय सुरु करण्यासाठी येणारा खर्च तसेच सद्य:स्थितीत दैनंदिन खर्च विमा संचालनालय, मुंबई या कार्यालयाच्या "मागणी क्र.जी-७, मुख्य लेखाशीर्ष २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ६० इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम, १०१ गरीब कुटुंबांसाठी वैयक्तिक अपघात विमा योजना, (०१) विमा निधीचे व्यवस्थापन, (०१) (०१) सर्वसाधारण विमा निधी (अनिवार्य) (२२३५०५३४)" या लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सदर कार्यालयाच्या दैनंदिन खर्चासाठी नवीन लेखाशीर्ष उघडणे तसेच "आहरण व संवितरण अधिकारी" घोषित करण्याची कार्यवाही वित्त विभागाच्या (अर्थसंकल्प व कोषा.प्रशा-५) मान्यतेने स्वतंत्रपणे करण्यात येईल.

७. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७.०४.२०१५, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-३, परिच्छेद क्र.२७(२) नुसार आणि उप विभाग एक, अ.क्र.२, ३ व १० अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारानुसार आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१०८/२०१९/व्यय-२, दि.२८.०२.२०१९ अन्वये दिलेल्या अभिप्रायानुसार सदरचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashatra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३०२१७५८०१९७०५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Shubhangi Rajan Sheth

Digitally signed by Shubhangi Rajan Sheth
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed6787d4f25b2cc00214a10047a10d4fa848c8d19fb8dda27b4525e3ace2c767, cn=Shubhangi Rajan Sheth
Date: 2019.03.02 18:01:16 +05'30'

(शुभांगी शेठ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

१) मा.राज्यपालांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.वित्तमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव

४) सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
५) सर्व विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६) सर्व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
७) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई
८) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर
११) महालेखापाल (लेखा परीक्षा-३), महाराष्ट्र, मुंबई
१२) महालेखापाल, स्थानिक संस्था, लेखापरीक्षा व लेखे, मुंबई
१३) वरिष्ठ महालेखापाल, स्थानिक संस्था (लेखा परीक्षा व लेखे), नागपूर
१४) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१५) चालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१६) अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१९) सर्व उप कोषागार अधिकारी
२०) मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
२१) मंत्रालयातील सर्व विभाग,
२२) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२३) मंत्रालयातील सर्व विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
२४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
२५) सचिव, राज्य निवडणूक आयोग.
२६) *प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा,) मुंबई
२७) *प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई
२८) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२९) *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
३०) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई
३१) सदस्य सचिव, राज्य महिला आयोग, मुंबई
३२) महासंचालक, यशदा, पुणे
३३) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
३४) प्र.कुलसचिव, सर्व विद्यापीठे / कृषी विद्यापीठे / इतर विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
३५) वित्त विभागातील सर्व कार्यासने
३६) जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
३७) बहुजन समाज पार्टी १, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई - १
३८) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरेक नं-१ योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई -२०.
३९) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी,३१४,राजभवन,एस.व्ही.पटेल रोड, मुंबई -४

४०) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस वरळी, मुंबई-१३
४१) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई -२५
४२) राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री-प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-२१.
४३) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चाळ, दादर, मुंबई -२८.
४४) निवड नस्ती, विमा प्रशासन कार्यासन, वित्त विभाग

*पत्राद्वारे.